

जळगाव : 'उमवि'त सायबर गुन्हे जागरुकतेसंदर्भात झालेल्या कार्यशाळेत बोलताना प्रा. एस. टी. इंगळे. शेजारी मान्यवर.

# तंत्रज्ञानाच्या जागरुकतेमुळे सायबर गुन्हे होतील कमी

## प्रा. एस. टी. इंगळे : 'उमवि'त कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. २१ : डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढलेल्या वापरामुळे सायबर सुरक्षितेबाबत जागरुकता केल्यास गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे मत प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि पुण्याच्या क्विक हिल फाउंडेशनतर्फे बुधवारी (ता. २१) 'सायबर सुरक्षितता आणि जागरुकता' या विषयावर झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. व्यासपीठावर जळगाव सायबर सेलचे पोलिस उपनिरीक्षक दिगंबर थोरात, क्विक हिल फाउंडेशनचे महेश भरडी, महाराष्ट्र पोलिसचे सचिन सोनवणे व दिलीप चिंचोले, प्रशाळेचे संचालक प्रा. एस. आर. कोल्हे, प्रा. मनीष जोशी, प्रा. अजय पाटील उपस्थित होते.

सायबर सेलचे दिगंबर थोरात म्हणाले, की सायबर सुरक्षेबाबतची जागरुकता करण्याचे काम पोलिसांचे आहे. मात्र, प्रशिक्षित विद्यार्थी हे काम करीत आहेत. त्यामुळे सायबर गुन्हे कमी होण्यास मदत होईल.

प्रा. राजू आमले यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी पाटील व कुंदन गोसावी यांनी सूत्रसंचालन केले.

# प्रा. दीपक दे[...] केले रसिकां[...]

जळगाव, ता. २१ : बसस्थानकावरील उदघोषणांचा आवाज, विमानतळावरील विविध भाषांतील उदघोषणांचा आवाज काढत, विविध नेत्यांच्या आवाजाचे सादरीकरण करून रसिकांना हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे यांनी लोटपोट केले. येथील व. वा. वाचनालयातर्फे 'हास्यकल्लोळ' कार्यक्रम झाला.

प्रा. देशपांडे यांनी जुन्या चित्रपटातील गाणी, नवीन चित्रपटातील बदलेला गाण्यांचा आवाजातील बाज सांगितला. ग्रामीण भागातील भाषणांतील गंमतीजमती सांगताना मराठी भाषेवर कानडी, तेलगू, हिंदी या भाषांच्या प्रभुत्वावर सोलापुरी मराठी हा वेगळा बोलीभाषेचा प्रकार तयार झाला. त्यांची वैशिष्टे, विविध भाषांच्या उदाहरणांच्या